# अडीच वर्षांत बारा कोटींचे एमडी जप्त

## नाशिक पोलिसांची कारवाई; जुन्या-नव्या गुन्ह्यांतील पाठराखे रडारवर

नाशिक | प्रतिनिधी

नाशिक पोलीस आयुक्तालयासह एनडीपीएस पथकाने गेल्या अडीच वर्षांत शहरातून सुमारे ११ कोटी ७५ लाख २८ हजार रुपयांचे ड्रग्ज जप्त केले आहे. या गुन्ह्यांच्या सविस्तर तपासासंदर्भात पथकाला पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सूचना केल्या आहेत. दरम्यान, एनडीपीएस पथकाला सर्व संशयितांच्या 'सीडीआर'चे तांत्रिक विश्लेषण करून तस्करांची साखळी उघड करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आता जुन्या व नव्या गुन्ह्यांत अनेक संशयितांसह त्यांची 'पाठराखण' करणाऱ्यांवर कठोर कारवाईची दाट शक्यता आहे.

ऑक्टोबर २०२३ मध्ये वडाळा गावात 'छोटी भाभी'च्या अड्ड्यावर रेड करून एनडीपीएस पथकाने मॅफेड्रॉन तस्करांना पकडले होते. यानंतर ड्रग्जमाफिया ललित पानपाटीलचा सामनगाव रोडवरील मॅफेड्रोन कारखाना, सनी पगारे व अर्जुन पिवाल यांचा सोलापुरातील कारखाना 'एनडीपीएस'ने उद्ध्वस्त केला होता. दरम्यान, अडीच वर्षांत या पथकाने सातहून अधिक टोळ्यांना गजाआड केले. संदीप कर्णिक यांनी आयुक्तपदाची सूत्रे नोव्हेंबर २०२३ मध्ये हाती घेतल्यापासून पथकाला अविरत कारवायांसाठी मोकळीक दिली. त्यामुळे पथकाने एमडी तस्करीला महिलांचा समावेश असलेल्या चार टोळ्या उघड केल्या. त्यातच युवराज पाटील या अंमलदाराचाही एमडी तस्करीत सहभाग असल्याने निष्पन्न झाल्यावर त्याला संबंधित गुन्ह्यात सहसंशयित करून बडतर्फ करण्यात आले आहे. त्यानुसार तांत्रिक तपासाद्वारे संशयितांसोबत वारंवार बोलणारे, सोबत राहणारे, निकटवर्तींवर करडी नजर ठेवत त्यांचाही 'ड्रग्ज' तस्करीत सहभाग असल्यास कायदेशीर कारवाईची सुरू होणार आहे.

### ठळक मुद्दे

- सन २०२३ मध्ये अंमली पदार्थविरोधी पथक (एनडीपीएस) कार्यान्वित.
- पथकाने गांजा, गुटखा, भांग तस्करांच्या मुसक्या आवळल्या.
- सलग दोन वर्षांपासून मॅफेड्रॉन (एमडी) तस्करी उघड.
- कारखाने, गोदामांसह दोन मोठ्या टोळ्या गजाआड.
- टोळ्यांत पाच ते सहा तरुणी-महिला.
- पैशांच्या हव्यासाकरता तस्करी.

### एमडी (मॅफेड्रॉन)

| सन | गुन्हे | संशयित | मुद्देमाल | किंमत |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ३ | ३४ | १५ किलो १७ ग्रॅम | १० कोटी ७३ लाख ४३ हजार ५०० रुपये |
| २०२४ | ११ | २९ | ४४६.०५ ग्रॅम | २१ लाख दोन हजार २२० रुपये |
| २०२५ | १२ | २९ | ३१४.५ ग्रॅम | १५ लाख ४३ हजार रुपये |

### गांजा

| सन | गुन्हे | संशयित | मुद्देमाल | किंमत |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ८ | १८ | १०७ किलो ८१५ ग्रॅम | १४ लाख २८ हजार ४६७ रुपये |
| २०२४ | १६ | ३१ | २६८ किलो ५३९ ग्रॅम | ३८ लाख ७७ हजार ४४१ रुपये |
| २०२५ | ३ | ३ | ३७ किलो ११७ ग्रॅम | ६ लाख ४२ हजार ऐंशी रुपये |

'ड्रग्ज'मध्ये कोणत्याही स्वरुपाचा संशयित असला तरी त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करत आहोत. अंमली पदार्थांबाबत कठोर कारवाईचे आदेश 'एनडीपीएस'ला दिले आहेत. पोलीस ठाणे स्तरावरील पथकेही कारवाई करत आहेत.

**- संदीप मिटके,**
सहाय्यक पोलीस आयुक्त,
गुन्हे शाखा, नाशिक

## थोडक्यात

### पत्नीस मारहाण

**नाशिक |** मुलांना भेटण्यासाठी गेलेल्या पत्नीला संशयित पतीने धारदार वस्तूने मारून दुखापत केली. तिच्या दुचाकीवर दगड फेकून नुकसान केले. २२ वर्षीय पत्नीच्या फिर्यादीनुसार, मंगळवारी (दि. २४) दुपारी दोन वाजता हा प्रकार घडला असून संशयितास अटक करण्यात आली आहे. यात पीडितेच्या मोपेडचे नुकसान झाले असून, पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल आहे.

### दुचाकीस्वार जखमी

**नाशिक |** दिंडोरीरोडवर भरधाव वेगातील कारने कट मारल्याने दुचाकीस्वार दुभाजकावर जाऊन पडल्याने त्यास डोक्याला गंभीर दुखापत झाली. अनिल एकनाथ बोरस्ते असे त्याचे नाव आहे. सुनीता सुशील कावळे (४८, रा. त्रिमूर्ती चौक, सिडको) यांच्या फिर्यादीनुसार, २३ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांचे भाऊ अनिल हे दुचाकीने दिंडोरी रोडने जात होते. त्यावेळी कारचालकाने त्यांना कट मारल्याने ते दुभाजकावर पडले. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. गेल्या महिनाभरापासून ते खासगी रुग्णालयात कोमात आहेत. म्हसरूळ पोलिसात अज्ञात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल आहे.

# अवैध सावकार वैष्णव न्यायालयात

## कार्यालयावरील पक्षाचे नाव हटवले

नाशिक | प्रतिनिधी

अवैध सावकारीचा धंदा मांडून लाखो रुपये उकळणारा भाजप पदाधिकारी सागर वैष्णव याच्या सातपूर येथील संपर्क कार्यालयावरील भाजपचे नाव व चिन्ह पक्षाने हटवले आहे. पक्षाच्या जोरावर अवैध वसुलीसह अन्य उद्योग करणाऱ्या सागरवर गुन्हा दाखल झाल्याने त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. आता त्याने अटक टाळण्यासाठी न्यायालयात धाव घेतली आहे. त्याच्या अर्जावर सुनावणी झाली असून, न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे.

श्रमिकनगर येथे राहणारा सागर वैष्णव हा भाजप पदाधिकारी असल्याचा दावा करत जनसंपर्क कार्यालय चालवत होता. मात्र, याच राजकीय ओळखीचा वापर करून त्याने अनेक गरजूंना १० ते २० टक्के व्याजदराने रक्कम देत अवैध सावकारी केली. या सावकारीतून दुप्पट ते तिप्पट रक्कम वसूल केल्याचा आरोप होतो आहे. त्याच्या जाळ्यात अडकलेल्या वसंत घायाळ यांनी जिल्हा उपनिबंधकांसह सातपूर पोलिसात तक्रार दाखल करून हा प्रकार उघडकीस आणला. या तक्रारीच्या आधारे सातपूर पोलीस ठाण्यात आठ दिवसांपूर्वी सागर वैष्णवविरोधात गुन्हा दाखल आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा राजकीय फटका भाजपला बसण्याची शक्यता असल्याने पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून वैष्णवच्या जनसंपर्क कार्यालयावरून 'भारतीय जनता पक्ष' हे नाव हटवण्याचे आदेश दिले. त्यामुळे त्याच्या कार्यालयावरील फलक हटवण्यात आला आहे.

### भाजपला नुकसान?

सागर वैष्णवला अटक होणार की जामीन मिळणार? ते लवकरच स्पष्ट होणार आहे. मात्र या प्रकरणामुळे भाजपला स्थानिक पातळीवर राजकीय नुकसान होण्याची शक्यता आहे. यापूर्वीही शहरात वैभव देवरे व कुंडलवाल पिता-पुत्राने अवैध सावकारी केल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर आता सागर वैष्णव प्रकरण समोर आल्याने चर्चा झडू लागली आहे. अवैध सावकारांवर कठोर कारवाई होत नसल्याने एक-दीड महिन्यांनी असे प्रकार समोर येतात. त्यामुळे सामान्यांत संताप व्यक्त होत आहे.

# रेल्वे तिकीट तपासणीसावर हल्ला

**नाशिकरोड |** नाशिकरोड रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र. एकवर ड्युटीवर असलेल्या रेल्वेच्या तिकीट तपासणीसावर एका अनोळखी प्रवाशाने हल्ला करून दुखापत केली. याप्रकरणी नाशिकरोड लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नंदकिशोर रमेश शिंदे (३६,, रा. ऋतुराज अपार्टमेंट, जेलरोड, नाशिकरोड) हे रेल्वे खात्यात तिकीट तपासणीस (TC) म्हणून कार्यरत आहेत. पहाटे ५.२५ वाजेच्या सुमारास ते आपल्या सहकारी सुनील प्रकाश शिंपी यांच्यासोबत नाशिकरोड रेल्वे स्थानकावरील ऑफिसजवळ कर्तव्यावर होते. त्याचवेळी एक अनोळखी व्यक्ती तिकीट न दाखवता पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शिंदे यांनी त्याला तिकीट विचारल्यावर त्यास राग आल्याने त्याने शर्टच्या खिशातून एक धारदार वस्तू काढून फिर्यादीच्या डाव्या गालावर, कानाजवळ मारहाण केली व पळून गेला.

हल्ल्यात जखमी झालेल्या शिंदे यांना तत्काळ उपचारासाठी जयराम हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक मोरे, पो. ह. आव्हाड, पो. ह. शिरसाठ यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. अधिक तपास उपनिरीक्षक अश्विनी टिळे करत आहेत.

# माझे मनी रुप तुझे




भाग-१६
**नंदन रहाणे**

**नात्यातली** माणसे शक्यतोवर एकमेकांबद्दल फारसे चांगले बोलत नाहीत, असे नेहमीच आढळून येते. सतत सोबत राहिल्याने स्वभावातले अवगुण, उणिवा, दोष पुरेपूर समजलेले असतात. शिवाय परस्परांकडून ज्या अपेक्षा ठेवलेल्या असतात त्या पूर्ण न झाल्याने म्हणा किंवा त्यामागचे स्वार्थी हेतू समजल्याने म्हणा... एकप्रकारचा कडवटपणाही निर्माण झालेला असतो. आपापसातील स्पर्धा, असूया, हेवादावा हेही कारणीभूत ठरतेच. त्यामुळे 'गणगोत अन् सुखाला पोत' अशी म्हण प्रचारात आलेली असावी. 'पोत' म्हणजे पेटता काकडा. कापडी तुकडे वळून वळून त्याचा जाड सोट तयार करतात आणि तो तेलात भिजवून गोंधळाच्या वेळी रात्रभर पेटता ठेवतात. या पोताची ज्वाला चांगलाच चटका देते. तसाच अनुभव गणगोताकडून येतो म्हणून ही अन्वर्थक म्हण जुनी माणसे वापरत असत.

जगात खूप वाईट वागणारी माणसे जशी असतात, तशी काही अतिशय चांगली माणसेही असतातच. भले ती संख्येने खूप कमी असतील, पण तशी आढळतात, हेही सत्य आहे. त्यांचेही तीन प्रकार असतात. काही जगापासून पूर्ण अलिप्त राहतात. ना कोणाच्या अध्यात, ना मध्यात... काही जेवढ्यास तेवढे संबंध ठेवून जगतात. कोणालाही कसलाच उपद्रव देत नाहीत... मात्र, काहीजण असे असतात की ते केवळ जगाचे भले करण्यासाठीच जगत असतात. स्वत:ला कितीही त्रास झाला, नुकसान सोसावे लागले तरी ते मागे हटत नाहीत.

अशा जगावर उपकार करणाऱ्यांनाच संत म्हणतात. संत हे कुणी संन्यासी, वानप्रस्थी वा परमहंस नसतात. तर ते संसार करणारे गृहस्थच असतात. बायको व मुले यांचे पालन करण्याची जबाबदारीही ते निभावत असतात. मात्र, सर्वांना सुखोपभोगाची, मौजमजेची साधने उपलब्ध करून देण्याइतपत स्वार्थी विचार, व्यवहार संत करत नाहीत. त्यामुळे कुटुंबियांना अनेक लहानसहान सुखांपासून वंचित राहावे लागते. साहजिकच रक्ताचे नातेवाईक संतावर वैतागलेले किंवा संतापलेले दिसले तर स्वाभाविक ठरते. मात्र कधीतरी संतांच्या पत्नीला, मुलांना, भावा-बहिणींनाही त्यांच्या कार्याचे मोल समजून येत व तेही त्यात सहभागी होऊन भक्तिप्रसाराचे आणि लोकप्रबोधनाचे कार्य करू लागतात. नामदेवराय व तुकोबाराय यांच्या घरातच अशी उदाहरणे आढळतात. त्यापैकी नामदेव सुपुत्र नारायण यांच्या या अभंगात, त्यांच्या समर्पणशील वृत्तीचे जे दर्शन घडते ते अत्यंत मनोवेधक आहे...

**देवा, माझे मी पण**
**ठेवी आपुले चरणी ।**
**घाली माझे मनी ।**
**रुप तुझे ।।१।।**
**मग मी लोकाचारी**
**असेन वर्तता ।**
**राहीन चिंतिता ।**
**चरणी तुझे ।।२।।**
**चंदनाची वृत्ती वेधले तरुवर ।**
**सबाह्य अभ्यंतर ।**
**काय जाले ।।३।।**
**सरिता सिंधुसी मिळोनी**
**हारपली ।**
**सागरचि जाली । एकसरे ।।४।।**
**नारा म्हणे शरण**
**आलो केशिराजा ।**
**ऐसा भाव माझा ।**
**करी गावेगी ।।५।।**

संत नामदेवांचा नारा हा मोठा मुलगा त्यांना एकूण ४ मुले व १ मुलगी त्यांपैकी नारा हा थोरला. वडिलांनी घेतलेले विठ्ठलाचे वेड, त्यापायी आईचे व त्यांचे उडणारे खटके, आजी व आजोबांना लागलेली कर्त्या वयाच्या मुलाची चिंता हे सारे या नाराने अनुभवलेले असणारच. मात्र, तो व हे सगळेच नंतर अभंग लिहू लागलेत हे फारच विशेष! याचा अर्थ असा होतो की, नामदेव महाराजांच्या कार्याचे मोठेपण या सर्व कुटुंबियांना समजले होते. या अभंगात नारा विठ्ठलाला विनवीत आहेत की, हे देवा, माझा जो अहंकार आहे तो काढून घे व तुझ्या पायांपाशी ठेवून दे. त्याऐवजी तुझे रूप माझ्या मनीमनासी ठसव. मग मी लोकांमध्ये वावरेन खरा, पण सतत तुझ्या चरणांचे स्मरण करत राहीन...

चंदनाचा वृक्ष काय करतो, तर भोवतीच्या लहान-मोठ्या झाडांनाही आपल्याप्रमाणेच सुगंधी बनवून टाकतो. तुझ्यामुळे मी पण अंतर्बाह्य तसाच होईन. नदी येते आणि सागरात विलीन होते. मग तिचे स्वतंत्र नदीपण उरते का? तर नाही! नारा म्हणतो, हे केशिराजा, मी तुला शरण आलो आहे. माझाही भाव तू वेगाने तसाच करून टाक... माझे स्वतंत्र अस्तित्वच मिटवून टाक... मला चंदन कर, समुद्र कर, विठ्ठल कर!

# वाहतूक पोलिसांचा स्तुत्य उपक्रम

## रस्त्यातील खड्डा बुजवून सामाजिक भानाचा संदेश

**पंचवटी |** बळीमंदिर परिसरात वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या खड्ड्यांमुळे नागरिक हैराण झाले असताना, वाहतूक पोलिसांनी पुढाकार घेऊन रस्त्यावरील खड्डा बुजवून सामाजिक भानाचे उदाहरण समाजासमोर सादर केले.



नाशिक शहर वाहतूक विभागातील पोलीस नाईक विशाल भदाणे व हवालदार सोपान पवार यांनी केवळ ड्युटीवर न थांबता, आपल्या कर्तव्याच्या पलीकडे जाऊन स्वखर्चातून हा खड्डा बुजवला. वाहतूक पोलिसांकडून नागरिकांच्या समस्यांकडे सहानुभूतीने पाहत प्रत्यक्ष कृती करत मदतीचा हात पुढे करण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे नागरिकांनी सांगितले. रस्त्यावर पडलेला मोठा खड्डा वाहतुकीस धोका निर्माण करत होता. भदाणे आणि पवार यांनी प्रशासनाची प्रतीक्षा न करता कृती करून रस्ता सुकर केला. त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

समाजहितासाठी पुढे सरसावणारे हे पोलीस खरोखरच अभिनंदनास पात्र असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. या उपक्रमामुळे नाशिक वाहतूक पोलीस दलाची प्रतिमा सकारात्मक दिशेने उंचावली आहे. इतर विभागांनाही या कृतीतून प्रेरणा मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

# हत्येची उकल, पण सुगावा लागेना

## सीसीटीव्ही, मोबाईलसह लोकेशन नसल्याने तपासात अडथळे

नाशिक | प्रतिनिधी

चामरलेणीच्या पायथ्याजवळ रविवारी (दि.२१) सकाळी कंटेनर चालकाच्या निर्घृण हत्येनंतर संशयित मारेकऱ्यांचा चार दिवस उलटूनही अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. स्ट्रीटलाईटचा अभाव असलेल्या हायवेवर ही घटना घडल्यावर येथे एकही सीसीटीव्ही नसल्याने तपासात अडचणी येत आहेत. विशेष म्हणजे मृत चालकाकडे मोबाईलच नसल्याने तपासात अडथळे येत आहेत.

दरम्यान, या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी म्हसरूळ पोलिसांसह गुन्हे शाखेसह तांत्रिक विश्लेषण विभागाची पथके कार्यरत झाली आहेत. दुसरीकडे ही हत्या का व कोणी केली हे कोडे उलगडण्यास अवधी लागण्याची शक्यता आहे.

चामरलेणीच्या पायथ्याजवळ अनोळखी तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे समोर आल्यावर नऊ तासांच्या आत मृतदेहाची ओळख पटवण्यात म्हसरूळ पोलिसांना यश आले होते. उमेश आंबिगार (३४, रा. मरकुंडा, ता. बिदर, कर्नाटक) असे हत्या झालेल्या कंटेनरचालकाचे नाव असल्याचे समोर आले. तो कंटेनरचालक असल्याने गेल्या सात दिवसांपूर्वी हैदराबाद येथून कंटेनरमध्ये साहित्य भरून दिंडोरीत जात होता, तेव्हा ही घटना घडल्याचे समोर आले. मारेकऱ्यांनी पहाटे आरोग्य विज्ञान विद्यापीठाजवळील मुख्य रस्त्यावर कंटेनर अडवून कॅबिनमध्येच त्याची हत्या केल्याचे उघड झाले होते. तपास सुरू असतानाच काही तासांनंतर आरोग्य विज्ञान विद्यापीठाजवळील हायवेवर बेवारस अवस्थेत केए ५६-६८३० या क्रमांकाचा कंटेनर आढळला. वरिष्ठ निरीक्षक अंकुश चिंतामण आणि तपास पथकासह फॉरेन्सिक पथक दाखल झाले. तेव्हा कंटेनरच्या कॅबिनमध्ये रक्ताने माखलेले हूक व रक्ताचे डाग आढळून आले. कंटेनर ताब्यात असला तरी ही हत्या कोणी केली? ते उघड होत नसल्याने आता पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणासह पारंपरिक तपासावर भर दिला आहे.



### ठळक मुद्दे

- कंटेनरच्या कॅबिनमध्ये रक्ताने माखलेले हूक.
- आठवडाभरापूर्वीच चालक उमेशचा मोबाईल हरवला.
- हॉटेलचालक किंवा कुणाकडूनही मोबाईल घेत कुटुंबाच्या संपर्कात.
- गेल्या नऊ वर्षांपासून उमेशला मद्याचे व्यसन.
- ट्रकवरील नंबरमुळे त्याची ओळख पटली.

चामरलेणी ते कंटेनर मिळाल्याचे अंतर केवळ दोन किलोमीटर.

- संशयित व मारेकरी ओळखीचे असण्याचा संशय.

### मारेकरी स्थानिक

चालक उमेशने घटनेच्या काही तासांआधीच कुटुंबाला कंटेनरमधील डिझेल संपल्याची माहिती दिली होती. त्याने क्लिनरला त्याच्यासोबत नेले नसल्याचा दावा कुटुंबाने केला. त्यामुळे हत्येच्या प्रकरणात कोणीतरी पोलिसांचे लक्ष भरकटवत असल्याचा संशय आहे. हत्येनंतर त्याचा मृतदेह पायथ्याशी आणून टाकल्याचे समोर आले. मारेकरी स्थानिक असण्याचा संशय बळावला आहे.

# रिक्षातील विद्यार्थिनी जखमी

**नाशिक |** तिबेटियन मार्केट येथील सिग्नलवर भरधाव कारने रिक्षाला धडक दिली. या अपघातात रिक्षेतील मुलीसह तिचे चालक वडील जखमी झाले असून रिक्षाचेही नुकसान झाले आहे.

## निधन वार्ता...



### अशोकराव देशमुख

**जळगाव |** येथील पाटबंधारे खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी अशोकराव गुलाबराव देशमुख (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, नातवंड असा परिवार आहे. ते नामको बँकेचे व्यवस्थापक तुषार देशमुख यांचे वडील तर नाशिक 'देशदूत'चे सल्लागार संपादक शैलेंद्र तनपुरे यांचे सासरे होत.



### मंगला वेताळ

**नवीन नाशिक |** कम्फर्ट झोन सोसायटी अंबड येथील रहिवासी मंगला वेताळ (६६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. पवन वेताळ व वनविभागाचे कर्मचारी प्रलय वेताळ यांच्या त्या मातोश्री होत.



### सुनीता सोनवणे

**नाशिक |** मुंबई मंत्रालयातील सेवानिवृत्त कर्मचारी, वडगाव, ता. कोपरगाव येथील भूमिपुत्र भागीनाथ पांडुरंग सोनवणे यांच्या पत्नी सुनीता भागीनाथ सोनवणे (५८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दीर, दोन नणंद, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चेंबूर येथील कुंदन सोनवणे यांच्या त्या मातोश्री होत.



### नेमिचंद दगडे

**नाशिक |** गोंदेगाव, लासलगाव येथील रहिवासी नेमिचंद स्वरूपचंद दगडे (७८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते नवकार ॲडव्हर्टायझिंगचे संचालक शैलेश दगडे यांचे वडील होत.



### सदाशिव तिडके

**कसबे सुकेणे |** येथील प्रगतिशील शेतकरी व माळी समाज कार्यकर्ते सदाशिव त्रंबक तिडके (७६) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, भाऊ, बहिणी, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



### रामनाथ सानप

**निफाड |** शिवरे (ता. निफाड) येथील प्रगतिशील शेतकरी रामनाथ लक्ष्मण सानप (७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, भाऊ, पुतणे, पुतणी, भावजयी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



### ताराबाई आहेर

**लासलगाव |** वनसगाव (ता. निफाड) येथील ताराबाई शिवाजी आहेर (६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, चार मुली, भाऊ, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नाभिक समाज कार्यकर्ते शिवाजी आहेर यांच्या पत्नी होत.


# क्लासिफाईड / सुपरमार्केट

### पाहिजेत

**हॉटेल** संजय लिकर बार कळवण वेटर पाहिजे. मो. 9637777109 / 9370075335. (25/06-BK-2311)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

### व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

### सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00556)

### नावात बदल

**My** old name Suresh Lala has been changed to new name Suresh Ramchand Lala as per Aadhaar No. 6003 4284 4119. (BK-2416)

---

**MY** OLD NAME MANDAKINI DILIP BANKAR HAS BEEN CHANGED TO MY NEW NAME MANDAKINI DILIPRAO BANKAR As Par Aadhar No. 7365 2155 1059. (BK-2411)

---

**MY** OLD NAME DILIP SHANKARRAO BANKAR HAS BEEN CHANGED TO MY NEW NAME DILIPRAO SHANKARRAO BANKAR As Per Aadhar No 5324 6450 2547. (BK-2411)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

### वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६ ◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११०० ◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८ ◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.